# व्हिडीओकॉन 'डीटूएच'चे रिचार्ज आता मोबाईलद्वारे

मुंबई, ता. ५ : व्हिडीओकॉन 'डी२एच'ने मोबाईल पेमेंट क्षेत्रातील आघाडीच्या 'ॲटम टेक्नॉलॉजीज'सोबत भागीदारी करून आपल्या ग्राहकांसाठी मोबाईलवर आधारित डीटीएच रिचार्ज सेवा सुरू करीत असल्याचे आज जाहीर केले. त्याचा व्हिडीओकॉनधारकांना फायदा होणार आहे. व्हिडीओकॉन 'डी२एच'चे नोंदणीधारक आता आपल्या मोबाईलवर <atom> हा संदेश लिहून तो ५४९५९ या क्रमांकावर पाठवून 'ॲटम' नावाचे ॲप्लिकेशन सहजतेने डाऊनलोड करून आपले अकाऊंट तत्काळ रिचार्ज करू शकतात. नोंदणी पूर्ण केल्यानंतर ग्राहकांना ही सेवा उपलब्ध होणार असून क्रेडिट कार्डांचा उपयोग करून ते आपले अकाऊंट रिचार्ज करू शकणार आहेत. याबाबत व्हिडीओकॉन 'डी२एच'चे सीईओ अनिल खेरा म्हणाले, रिचार्ज करण्यासाठी ग्राहक सोपे आणि सहज पर्यायाच्या शोधात असतात, हे आयव्हीआर प्लॅटफॉर्मच्या यशातून सिद्ध होते. देवाणघेवाण करण्यासाठी सुरक्षित आणि वापरासाठी सोपे प्लॅटफॉर्म पुरविण्यासाठी ॲटम टेक्नॉलॉजीजच्या सिद्ध झालेल्या तंत्रज्ञानाचा आम्हाला, आमच्या ग्राहकांना सोपे सोल्युशन देण्यामध्ये मदतगार ठरणार आहे. ग्राहकांची सोय आणि समाधान हे आमचेही लक्ष्य आहे. या सेवेचा ग्राहकांना मोठा फायदा होणार आहे.